




दैनिक

# डोंगरचा राजा

www.dongarcharaja.com

email:dongarcharaja@gmail.com

संपादक-अनिल वाघमारे    Editor-Anil waghmare








बीड (महाराष्ट्र) ● वर्ष १ ले ● अंक-१०८ ● मंगळवार दि.१३ ऑक्टोबर २०२ ● पोस्टल परवाना: L SB/BEED/RNP-278/2026-2028 ● RNI No. MHMAR/25/A4406 ● किंमत २ रु. ● पाने - ४

BEED (Maharashtra) ● Vol: 1 ● Issue:108 ● Date: TUESDAY 13 October 2026 ● Postal Permission: L SB/BEED/RNP-278/2026-2028 ● RNI No. MHMAR/25/A4406 ● Rs. 2/- ● Pages : 4




# लोकांची दिवाळी 'गोड' होणार! एफडीएमधून बदली नाही, भेसळयुक्त अन्न, औषधांविरोधात लढाई सुरूच

## एमपीएससीमध्ये बदलीच्या चर्चेवर तुकाराम मुंढेंची पोस्ट

मुंबई। प्रतिनिधी

अन्नाच्या भेसळविरोधात मोर्चा उघडणारे धडाडीचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढेंच्या ताज्या सोशल मीडिया पोस्टमुळे दसरा-दिवाळीच्या तोंडावर राज्यातल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आपली बदली झाली नसून आपण एफडीए विभागातच कार्यरत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. तसेच अन्नाच्या भेसळीविरोधात आपली लढाई सुरूच राहील असंही मुंढे यांनी म्हटलं आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात लोकांना किमान सुरक्षित अन्न मिळण्याच्या हमीची शक्यता आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील पेपरफुटीविरोधात आणि अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यामध्ये जवळपास ११ दिवस विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारलं होतं. सोमवारी (१२ ऑक्टोबर) मध्यरात्रीच्या सुमारास मंत्री शिवेंद्रराजे यांच्या शिष्टाईमुळे हे आंदोलन मागे घेण्यात आलं. एमपीएससीमध्ये झालेल्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी सरकारने एक चौकशी समिती नेमली आहे. या चौकशी समितीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या घोषणेनंतर काहीकाळ संभ्रमाचं वातावरण निर्माण झाल्याचं दिसून आलं. एमपीएससीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्याच्या बातम्या पसरल्या. त्यानंतर अन्न आणि औषध विभागाचं काय होणार? राज्यातील अन्नाच्या भेसळीविरोधातील लढाईचं काय होणार? तुकाराम मुंढेंच्या बदलीनंतर ही लढाई कायम राहणार का? असे अनेक प्रश्न विचारण्यात येऊ लागले.

मात्र, तुकाराम मुंढे यांची बदली झाली नाही, त्यांनी फक्त एमपीसएसीच्या चौकशी समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे ▶▶पान २ वर

# परिषदेच्या मागणीची अखेर सरकारकडून दखल

## डिजिटल मिडियाला शासन मान्यता मिळणार? आशिष शेलार यांचा शब्द

मुंबई : (दीपक कैतके याजकडून)

डिजिटल मिडियाला शासन दरबारी मान्यता देऊन जाहिराती, अधिस्वीकृती सारख्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद गेली पाच वर्षे सातत्यानं करीत आहे, आता सरकारला या मागणीचे महत्व समजले असून डिजिटल मिडियाची ताकद आणि व्याप्ती लक्षात घेता येत्या काळात डिजिटल माध्यमांना शासन दरबारी अधिकृत मान्यता मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल अशी ग्वाही भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे..

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने काळाची पाऊले ओळखत पाच वर्षांपुर्वीच डिजिटल मिडिया परिषद या स्वतंत्र विंगची स्थापना करून डिजिटल माध्यमातील पत्रकारांना संघटीत केले आहे तसेच त्याच्या प्रश्नांच्या संदर्भात पाठपुरावा केला आहे.. या पाश्र्वभूमीवर आशीष शेलार यांनी घेतलेल्या भूमिकेचे डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी स्वागत केले आहे.

प्रेस क्लबच्या वतीने आयोजित गप्पांची चावडी या अनौपचारिक संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.. यावेळी माध्यमातील स्थित्यंतरे आणि भविष्यातील आव्हानावर सविस्तर चर्चा केली. यावेळी प्रेस क्लबचे अध्यक्ष सुरेंद्र गांगण आणि उपाध्यक्ष पांडुरंग म्हस्के तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते..

मंत्री शेलार पुढे म्हणाले की, आजच्या काळात तंत्रज्ञानाकडे पाठ फिरवून चालणार नाही. आगामी काळ हा कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'चा (-ख) आहे. त्यामुळे माध्यम क्षेत्रातही एक मोठी क्रांती घडून आली आहे. वृत्तपत्रे (प्रिंट मीडिया) आणि वृत्तवाहिन्यांच्या (इलेक्ट्रॉनिक मीडिया) प्रवासांनंतर आता डिजिटल मीडिया हा जगभरात माहितीचा सर्वात वेगवान व प्रभावी मुख्य स्रोत ठरला आहे. त्यामुळे या बदलाची दखल शासनाने घेणे गरजेचे आहे.

डिजिटल पत्रकारांच्या अधिकारांविषयी बोलताना त्यांनी नमूद केले की, माहिती पोहोचवण्यात डिजिटल पत्रकारांचे योगदान मोठे आहे. शासन दरबारी प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाला जशी मान्यता, सुविधा आणि संरक्षण दिले जाते, तसाच दर्जा डिजिटल माध्यमांनाही मिळायला हवा. यासाठी शासन स्तरावर सकारात्मक धोरण आखण्यासाठी आपण वैयक्तिक लक्ष घाल असा विश्वासही त्यांनी यावेळी पत्रकारांना दिला.

# वीज तुटवड्यामुळे राज्यात भारनियमन; वाढत्या तापमानामुळे मागणीत प्रचंड वाढ



पुणे। प्रतिनिधी

'एल निनो'मुळे झालेली तापमानवाढ वीजपुरवठ्याच्या मुळावर आली आहे. विजेच्या वाढलेल्या मागणीच्या तुलनेत उपलब्ध वीज कमी पडत असल्याने महावितरणला राज्यात भारनियमन करण्याची वेळ आली आहे. गेल्या आठवडाभरापासून राज्यात भारनियमन होत असल्याचे उघड झाले असून, गेल्या काही वर्षांमध्ये प्रथमच असे झाले आहे.

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने (एसएलडीसी) किती भारनियमन झाले, याची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. या आकडेवारीनुसार, राज्यभरात गेल्या शनिवारपासून (३ ऑक्टोबर) जास्त मागणी असलेल्या संध्याकाळच्या वेळात भारनियमन करण्यात येत आहे. गेल्या बुधवारपासून (७ ऑक्टोबर) सायंकाळबरोबरच सकाळी सहा व सातलाही भारनियमन करण्यात आले, तर शनिवारी, सुमारे ७५० मेगावॅट तुटीमुळे भारनियमन झाले. त्यात वाढ होऊन गुरुवारी (८ ऑक्टोबर) वीजतूट एक हजार मेगावॉटहून अधिक, तर शुक्रवारी (९ ऑक्टोबर) १८०० मेगावॉटहून अधिक होती.

राज्यातील दररोजची विजेची मागणी सुमारे ३० हजार मेगावॉटवर पोहोचली आहे. त्यातील सुमारे २५ हजार मेगावॉट विजेची मागणी 'महावितरण'च्या ग्राहकांकडून, तर सुमारे ४ हजार मेगावॉट विजेची मागणी मुंबईतील ग्राहकांकडून आहे. मात्र, मुंबईत भारनियमन करण्यात येत नाही. तिथे वीजपुरवठा करणार्या अदानी, बेस्ट, टाटा या कंपन्यांना महावितरणकडून अतिरिक्त विजेचा पुरवठा करण्यात येतो. गरज पडल्यास मुंबईत वीज उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणला दरवर्षी सुरक्षा ठेव रक्कमही या कंपन्यांकडून देण्यात येते.

# मतदारयादीत नाव नोंदणीसाठी पुन्हा मुदतवाढ; मतदारांच्या अल्प प्रतिसादामुळे निवडणूक आयोगाचा निर्णय




मुंबई। प्रतिनिधी

राज्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी(एसआयआर) मोहिमेंतर्गत नवमतदारांसह प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना आपले नाव मतदार यादीत नोंदविण्यासाठी पुन्हा एकदा दत्तवाड देण्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला आहे त्यानुसार राज्यात मतदारांना पाठवण्यात आलेल्या नोटिसीना उत्तर देण्यासाठी तसेच प्रारूप मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार गेल्या दोन महिन्यांपासून राज्यात मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी मोहिम राबविली जात आहे. ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत यापूर्वीच्या मतदार यादीतील २ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. या मतदारांना पुन्हा मतदार यादीत नांवे नोंदविण्यासाठी संधी देण्यात आली असून आतापर्यंत ७ लाख १९ हजार ३८२ मतदारांनी नमुना-६ मध्ये अर्ज दाखल केले आहेत. मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्तीसाठी ३ लाख ९९ हजार ९२५ मतदारांनी अर्ज नमुना-८ मध्ये, तर नावे वगळण्यासाठी १८ हजार ७४८ अर्ज नमुना-७ मध्ये अर्ज दाखल केले आहेत.

राज्यात या मोहिमेला मतदारांकडून फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने सद्यस्थितीत प्रारूप मतदार यादी अंतिम केल्यास राज्यात लाखो मतदारांची नावे मतदार यादीतून बाहेर जातील त्यामुळे मोठा पक्ष निर्माण होईल अशी भीती व्यक्त करीत पुन्हा एकदा मदत वाढ देण्याची मागणी राज्याच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केंद्र निवडणूक आयोगाला केली होती.

सध्या देशभरात निवडणूक आयोगा विरोधात मतदारांमध्ये संतापाचे वातावरण असून अशातच महाराष्ट्रातील कोट्यवशी मतदारांची नावे कमी झाल्यास त्याचे खापर आयोगावर फोडले जाईल, या धास्तीने आयोगाने राज्यात या मोहिमेला पुन्हा वाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सध्याच्या प्रारूप मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी आयोगाने पाठवलेल्या नोटिसीला उत्तर देण्यासाठी आणि प्रारूप मतदार यादीतील बदलाबाबत हरकती दाखल करण्यासाठी २६ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आयोगाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार ही मुदत आज संपणार होती.

१ ऑक्टोबर या अर्हता दिनांकास किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे नवमतदार तसेच अन्य पात्र असूनही प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या नागरिकांना नमुना-६ भरून नाव नोंदविता येतील. त्यासाठी हे अर्ज ▶▶पान २ वर

# आ.सतिश चव्हाण विक्रमी मताधिक्यांनी विजयी होतील-अमरसिंह पंडित




गेवराई। प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. सतीश चव्हाण विक्रमी मताधिक्यांनी विजयी होतील त्यात कोणाच्याही मनात शंका ठेवू नका, शिवछत्र परिवाराच्या संदर्भात होत असलेला अपप्रचार आणि संभ्रम दूर करून आ. सतीश चव्हाण यांच्या विजयासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावेत असे आवाहन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. कार्यकर्त्यांनी गाफील न राहता एक एक मतदान आ. सतीश चव्हाण यांना कसे पडेल यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करावे असे आवाहन आ. विक्रम काळे यांनी केले. मराठवाडा पदवीधर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ पदवीधर संवाद बैठकी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मतदारांनी बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सतीश भानुदास चव्हाण यांच्या प्रचारार्थ गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात पदवीधर संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि शिक्षक आ. विक्रम काळे यांनी पदवीधर मतदारांशी संवाद साधत आ सतीश चव्हाण यांना विजयी करण्याचे आवाहन केले. या बैठकीस राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, रिपाइंचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अर्जुन बारगजे, शिक्षक संघटनेचे रवींद्र खोड, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदीप औटी, उपसभापती श्रीहरी पवार, माजी उपनगराध्यक्ष महेश दाभाडे, नगरपालिकेचे गटनेते खाजा शेख , कोचिंग क्लासेस संघटनेचे शिवाजी वराट यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, पदवीधर, शिक्षक, प्राध्यापक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, पदवीधरांसमोर रोजगारासह अनेक प्रश्न आहेत. उच्च शिक्षण घेऊनही अपेक्षित संधी मिळत नसल्याची भावना अनेक तरुणांच्या मनात आहे. त्यामुळे पदवीधर तरुणांना योग्य दिशा देण्याचे काम लोकप्रतिनिधींनी केले पाहिजे. पदवीधरांचे प्रश्न योग्य व्यासपीठावर मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. पदवीधरांचे प्रश्न विधानपरिषदेत मांडण्याच्या दृष्टीने उमेदवार सतीश चव्हाण यांना प्रथम पसंतीचे मत देण्याचे आवाहन त्यांनी केले. गेवराई विधानसभा मतदारसंघातून आ. सतीश चव्हाण यांना सर्वाधिक मताधिक्य मिळवून देण्याची जबाबदारी आपली असून यात कसल्याही प्रकारची शंका नाही. त्यामुळे आ. सतीश चव्हाण हेच प्रचंड मताधिक्याने विजय होणार असा विश्वास माजी आमदार अमरसिंह ▶▶पान २ वर

# ‘गंगा माऊली शुगर’चा ५ वा गळीत हंगाम सुरु

## शेतकऱ्यांना पहिला हप्ता ३ हजार रुपये मिळणार!-खा.रजनीताई पाटील

केज / प्रकाश मुंडे

चांगल्या संकल्पनेतून आणि प्रामाणिक हेतूने केलेल्या कार्याला नक्कीच यश मिळते, असा विश्वास काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या, माजी खासदार रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. केज तालुक्यातील गंगा माऊली सहकारी साखर कारखान्याच्या पाचव्या गळीत हंगामाचा शुभारंभ आणि सीबीजी (उइऋ) प्रकल्पाचे भूमिपूजन आज (दि. ११) मोठ्या उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी बोलताना त्यांनी कारखान्याच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

माजी खासदार रजनीताई पाटील यांच्या हस्ते व कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे, ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले, ह.भ.प. उद्धव बापू आपेगावकर, किरण पाटील, उद्योगपती राजेंद्र बोडखे, मयूर बोडके, आदित्य पाटील, प्रविण मोरे, राहुल सोनवणे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. हंगामाची सुरुवात दत्ता मुळे व त्यांच्या सुविद्य पत्नीच्या हस्ते विधिवत पूजा करून करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य - लक्ष्मणराव मोरे

कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, कारखान्याने मागील चार वर्षे यशस्वीपणे गाळप पूर्ण केले असून शेतकऱ्यांना नेहमी वेळेवर एफआरपीचे पेमेंट दिले आहे. जिल्ह्यात दर पंधरा दिवसांत पेमेंट देण्याचा पायंडा गंगा माऊली शुगरने पाडला आहे. शेतकऱ्यांना पैशासाठी कधीही चकरा माराव्या लागल्या नाहीत आणि यापुढेही अशी वेळ येणार नाही. कारखान्याचा फायदा थेट ऊस



उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवला जातो. यावर्षीच्या गळीत हंगामात शेतकऱ्यांना पहिला हप्ता ३,००० रुपये दिला जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. तसेच कारखाना परिसरात ए.आय. तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचे नवनवीन प्रयोग केले जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मान्यवरांचे मार्गदर्शन व गौरव

राहुल सोनवणे (जिल्हाध्यक्ष, काँग्रेस): खासदार रजनीताई पाटील व अशोकराव पाटील यांनी पाहिलेले स्वप्न आता प्रत्यक्षात उतरले असून, चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांच्या नेतृत्वाखाली कारखाना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर सातत्याने हसू आणत आहे. मागच्या हंगामात जिल्ह्यात सर्वाधिक भाव या कारखान्याने दिला आहे.

आदित्य पाटील (प्रदेश सरचिटणीस): गंगा माऊली साखर कारखाना नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध राहील आणि शेतकऱ्यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही.

प्रवीण मोरे (कार्यकारी संचालक): कर्मचाऱ्यांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बोनस दिला जाणार असून, कर्मचारी हा आमच्या परिवाराचा भाग असल्याने त्यांची पूर्ण काळजी घेतली जाईल, असे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार

यावेळी ऊस उत्पादन, वाहतूक आणि तोडणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या घटकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये:

उत्कृष्ट ऊस उत्पादक शेतकरी: सौ. मंगल दिनकर जाधव (प्रथम), विलास भैरवनाथ इंगळे (द्वितीय).

ट्रॅक्टर वाहतूक ठेकेदार: बाळासाहेब देवीदास राठोड (प्रथम), माणिक शंकर आडे (द्वितीय).

ट्रक वाहतूक ठेकेदार: रामदास सखाराम आडे (प्रथम), अहेमद अमीन शेख (द्वितीय).

मिनी वाहतूक ठेकेदार: संजय जयसिंग चव्हाण (प्रथम), अरूण बाबुराव जाधव (द्वितीय).

बैलगाडीवान (मिनी वाहतूक): कैलास दादाराव घुले (प्रथम), बाळु शिवाजी चाळक (द्वितीय).

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले तर आभार प्रदर्शन अविनाश आदनाक यांनी मानले. या उद्घाटन सोहळ्यास परिसरातील मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी व मान्यवर उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना आर्थिक प्रगतीच्या दिशेने नेण्याचा बँकेचा संकल्प-श्रीराम भोर



कवडगाव बु./प्रतिनिधी

शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याला कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढून पुन्हा उभे करण्यासाठी शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी अत्यंत गरजेची आहे. याच उद्देशाने महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या बीड विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या गेवराई शाखेमध्ये दिनांक ०८ आक्टोबर रोजी गेवराई तालुक्यातील शेतकरी बांधवांसाठी एका विशेष संवाद व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला तालुक्यातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या मुख्य कार्यालयातून प्रमुख मार्गदर्शक म्हणून बँकेचे सरव्यवस्थापक श्री.श्रीराम भोर हे विशेषत्वाने उपस्थित होते. तसेच, बीडचे विभागीय व्यवस्थापक श्री. हर्षल कुऱ्हाडे साहेब ते देखील शिबिरात उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची सुलभ आणि सविस्तर माहिती, संवाद व मार्गदर्शन करताना श्री. श्रीराम भोर साहेब यांनी अत्यंत सोप्या भाषेत माहिती दिली. त्यांनी सदरील योजनेचे निकष व अंमलबजावणीच्या कार्यपद्धतीची यथोचित माहिती यानिमित्ताने शेतकऱ्यांना सादर केली.

कर्ज माफीतील पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त कसा लाभ घ्यावा, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता कशी करावी, आणि कर्जमाफीनंतर घठखडकखघ- -र्ीं द्वारे कर्ज मागणी अर्ज, बँकेच्या प्रथम अर्ज प्रथम लाभ, इनवर्ड रजिस्टर प्रक्रिया याबद्दल ही माहिती देण्यात आली. तसेच नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीचा विकास कसा साधावा, यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता थेट बँकेशी संपर्क साधावा. बँक प्रशासन शाखा, क्षेत्रीय कार्यालय आणि मुख्य कार्यालय प्रत्येक टप्प्यावर तुम्हाला सहकार्य करण्यास तत्पर आहे, असा सकारात्मक विश्वास श्री. भोर यांनी व्यक्त केला.

बँक नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे याचा आवर्जुन उल्लेख करत क्षेत्रीय व्यवस्थापक श्री. हर्षल कुऱ्हाडे साहेब यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शेतकरीकेंद्री दृष्टिकोनावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, गेवराई तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांना या कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळवून देणे हे आमचे प्राधान्य आहे. बँकेचा प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी या प्रक्रियेत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी बांधील आहे. एकाही पात्र शेतकऱ्याला या योजनेपासून वंचित राहावे लागणार नाही, याची काळजी आम्ही घेत आहोत.

शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे, यात केवळ भाषणे न होता शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला. कर्जमुक्ती प्रक्रियेसंदर्भात शेतकऱ्यांच्या मनात असलेल्या विविध शंका आणि प्रश्नांची उत्तरे उपस्थित अधिकाऱ्यांनी अत्यंत संयमाने दिली. यामुळे शेतकऱ्यांमध्ये एक समाधानाचे आणि आशेचे वातावरण निर्माण झाले. यावेळी बँकेच्या विविध कर्जयोजना, मुदत ठेव योजना, वित्तिय समायोजन प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना, अटल पेंशन योजना, प्रधानमंत्री जन-धन योजना बद्दल चर्चा आणि मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांकडून करण्यात आले.

गेवराई शाखा व्यवस्थापक श्री. राहुल लिंगसे आणि सर्व कर्मचारी वृंदाने या शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले होते. या सकारात्मक आणि शेतकरी हिताच्या उपक्रमाबद्दल उपस्थित शेतकरी बांधवांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे विशेष आभार मानले.

कार्यक्रमाची सांगता शाखेच्या वतीने मानण्यात आलेल्या आभार प्रदर्शनाने झाली. या शिबिरामुळे गेवराई तालुक्यातील कर्जमुक्तीच्या प्रक्रियेला आता अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## चिंचोटी शालेय समितीच्या अध्यक्षपदी मारुती गोंडे

### आता होणार चिंचोटी शाळेचा कायापालट



चिंचोटी प्रतिनिधी

चिंचोटी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी मारुती रामानंद गोंडे यांची तर उपाध्यक्षपदी गोरख मदन माने यांची निवड करण्यात आली आहे. एकूण १७ सदस्य असलेल्या या समितीच्या निवड प्रक्रियेवेळी केंद्रप्रमुख प्रफुल्ल टकले यांनी निवड प्रक्रियेचे कामकाज पाहिले. या निवडीवेळी सरपंच भागवत गोंडे, उपसरपंच गोविंद शिवाजी गोंडे, अशोक नाना गोंडे, अशोक गोंडे, महादेव गोंडे, दत्ता पाटील गोंडे, साहेबराव गोंडे, समाधान गोबरे, केशव गोंडे, आप्पासाहेब गोंडे, शिवाजी गोंडे, गोविंद गोंडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष मारुती रामानंद गोंडे यांनी शालेय शिक्षण समितीच्या माध्यमातून शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देणे तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांसह मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे, क्रीडा व सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविणे, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन आणि नियमित पालक शिक्षक संवादावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन शालेय समितीमध्ये दत्ता गोरख गोंडे, रोहिणी सुमंत गोंडे, सीता बाळनाथ गोंडे, उर्मिला साहेबराव गोंडे, सोनाली कानोबा जावळे, अश्विनी सतीश गोंडे, गोविंद शिवाजी गोंडे आणि आयोध्या अश्रूबा लंगे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या नूतन निवडीचे सरपंच भागवत गोंडे, उपसरपंच गोविंद शिवाजी गोंडे, अशोक नाना गोंडे, दत्ता पाटील गोंडे, साहेबराव गोंडे, अशोक गोंडे, महादेव गोंडे, समाधान गोबरे, केशव गोंडे, आप्पासाहेब गोंडे, शिवाजी गोंडे, गोविंद गोंडे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व शिक्षणप्रेमींनी स्वागत करून अभिनंदन केले आहे. नवीन समितीमुळे चिंचोटी शाळेचा कायापालट होईल असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## वडवणीत श्रीमद् देवी भागवत कथा सोहळ्याचा भक्तिमय प्रारंभ!

वडवणी / प्रतिनिधी

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून वडवणी शहरातील जय भवानी नगर परिसरात आयोजित श्रीमद् देवी भागवत कथा सोहळ्याचा सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. भागवताचार्य ह.भ.प. अंकिता ताई महाराज माने यांच्या अमृतवाणीतून श्रीमद् देवी भागवत कथेचे निरूपण करण्यात येत असून, या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

सोमवार, दि. १२ ऑक्टोबर ते सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत देवी भागवत कथेचे प्रवचन जय भवानी नगर पांढरी वस्ती वडवणी येथे होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सोहळ्याच्या माध्यमातून भाविकांना देवीच्या महात्म्याचे, भक्तीचे आणि अध्यात्मिक विचारांचे श्रवण करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



या कथा सोहळ्यासाठी पखवाजाची साथ श्री. बापूगुरु महाराज सौंदणे, सिंथेसायझरची साथ श्री. शिवाजी महाराज नांदे, तबल्याची साथ श्री. लक्ष्मण महाराज गायके, तर गायनाची साथ सुमित्रा ताई बींगळे देत आहेत. संगीताची सुरेल साथ आणि देवी भागवत कथेचे रसाळ निरूपण यामुळे या धार्मिक सोहळ्याला विशेष रंगत येणार आहे.

१९ ऑक्टोबरला सांगता, कल्याचे कीर्तन व महाप्रसाद

सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी श्रीमद् देवी भागवत कथा सोहळ्याची सांगता होणार आहे. यानिमित्त कल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. वडवणी शहरासह परिसरातील भाविकांनी या धार्मिक सोहळ्यास उपस्थित राहून देवी भागवत कथेचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अंकुश महाराज टिपरे (नाथ सेवक).यांनी केले आहे.

**टि.सी.हरवला आहे**

**गणेश धोडींराम शिंदे** या नावाचा इ.८ वी पासचा मुळ टी.सी. वडवणी - बीड बस प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क-** मो.९०११७३१६१६

**सनद हरवली आहे**

**पवार निखिलेश**

**नवनाथ** या नावाची सनद क्रमांक. K१०२५५१ ही १० वी पासची मुळ सनद वडवणी - धारूर बस प्रवासात हरवली आहे. सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क-** मो.९९२१४४४०३२

**:: जाहिर प्रगटन ::**

**जाहिर प्रगटन देणार : लक्ष्मण अर्जुन शिंदे**
**रा.वडवणी, ता. वडवणी, जि. बीड.**

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, जाहिर प्रगटन देणार यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरून व दिलेल्या माहितीवरून जाहिर प्रगटन देण्यात येते की, आमच्या पक्षकाराने लक्ष्मण अर्जुन शिंदे, रा. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड यांच्या नावे असणारी नगरपंचायत वडवणी, ता. वडवणी, जि. बीड या शिवारामधील गट क्र. ६६१ मधील साईज ३० बाय ४० चा प्लॉट असून त्यापैकी एक प्लॉट १५ बाय ४० या साईजचा प्लॉट जहिर मुन्शी शेख, रा. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड, मो. क्र. ७०७१७५३४३४ यास विक्री केलेला आहे व उर्वरित एक प्लॉट १५ बाय ४० या साईजचा प्लॉट जाहिर प्रगटन देणार यांना विक्री करावयाचा आहे,

ज्याची चतु:सीमा :-
पूर्वेस : उर्दू शाळा
पश्चिमेस : शेख
दक्षिणेस : गट क्र. ६६०
उत्तरेस : रस्ता

अशा असून वरील वर्णनाची व चतु:सीमेच्या आतील जमीन जाहिर प्रगटन देणार यांनी कायमस्वरूपी विक्री करण्याचे ठरवले असून सदरील जमीन ही निर्वेद व निर्विवाद असल्याचे जाहिर प्रगटन देणार यांचे म्हणणे आहे.

तसेच या जागेमध्ये जर कोणाचे काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध तसेच इसारापावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, बोजा, दानपत्र, चोळीबांगडी किंवा काही न्यायालयीन वाद असतील तर संबंधितांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी दस्तऐवजासह तसेच कागदोपत्री पुराव्यासह आपला आक्षेप जाहिर प्रगटन देणार यांच्याकडे नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आला नाही तर जाहिर प्रगटन देणार हे वर उल्लेख केलेल्या जागेचे खरेदीदाराच्या हक्कात कायम खरेदीखत करून देतील व त्यानंतर कोणाचा कसल्याही प्रकारचा आक्षेप चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर हे जाहिर प्रगटन.

**मार्फत,**
**स्वाक्षरी/-**
**ॲड. एन. आर. लंगडे, वडवणी**
**मो. क्र. ९८६०९७१८१८**

**जाहिर प्रगटन देणार**
**स्वाक्षरी/-**
**लक्ष्मण अर्जुन शिंदे**
**मो. क्र. ९८८१४८४९५१**

### पान १ वरून

**लोकांची दिवाळी ‘गोड’ होणार!...**

असं सरकारने स्पष्ट केलं. त्यानंतर आता खुद्द तुकाराम मुंढे यांनीच सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून त्यावर स्पष्टीकरण दिलं आहे.

तुकाराम मुंढे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिलंय की, माझी एफडीएमधून बदली झालेली नाही. मी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र येथे आयुक्त म्हणून कार्यरत आहे. भेसळयुक्त अन्न आणि निकृष्ट औषधांविरुद्धची आमची लढाई सुरूच आहे.

दरम्यान, तुकाराम मुंढेंच्या या पोस्टनंतर राज्यातील भेसळखोरांचे धाबे पुन्हा एकदा दणाणले आहेत. त्यामुळे आगामी दसरा आणि दिवाळीच्या तोंडावर लोकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न, मिठाई मिळण्याची शाश्वती आहे.

--------

**मतदारयादीत नाव नोंदणीसाठी पुन्हा ...**

संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे ऑफलाइन पद्धतीने सादर करता येतील. तसेच ऑनलाइन अर्ज करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या हीींिं://ीोंशीी.शलळ.सेीं.ळप/ या संकेतस्थळाचा वापर करता येईल. विशेष म्हणजे आयोगाने नोटिशीत नमूद केलेल्या आधार, शिधापत्रिका, पासपोर्ट अशा विविध १३ प्रकारच्या कागदपत्रांपैकी आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्यास अन्य वैध कागदपत्रे किंवा दस्तऐवज सादर करता येतील. यासाठी अन्य कागदपत्रे (‘-पू जींहशी ऊेलीींशपीीं’) हा पर्याय बीएलओ पवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

--------

**आ.सतिश चव्हाण विक्रमी...**

पंडित यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी बोलताना आ. विक्रम काळे म्हणाले की, शिक्षक मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून काम करताना शिक्षकांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आपण प्रयत्न केले आहेत. संचमान्यता आणि जुनी पेन्शन योजना यांसारख्या विषयांवर संघर्ष केला असून पदवीधरांच्या प्रश्नांसाठीही आपण कटिबद्ध आहोत. पदवीधर निवडणुकीत कार्यकर्ते आणि मतदारांनी गाफील न राहता सजगपणे काम केले पाहिजे. प्रत्येक मत महत्त्वाचे असून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे. सर्वांनी एकत्रितपणे काम करून उमेदवार सतीश चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मत द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे यांनी केले. यावेळी प्राथमिक शिक्षक संघटनेचे विष्णू खेत्रे, कोचिंग क्लासेस संघटनेचे शिवाजी वराट आणि सरपंच संघटनेचे कालिदास नवले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समाधान इंगळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्राचार्या डॉ. रजनी शिखरे यांनी मानले. पदवीधर संवाद बैठकीला मतदारांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

------

## बीडमध्ये मंत्री रामदास आठवलेंची विराट सभा, हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे-शाम वीर

बीड/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.



राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या

विराट जाहीर सभेस बीड शहरातील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइं युवा नेते शाम वीर, अविनाश जोगदंड, संभाजी गायकवाड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, अड सुरेश वडमारे, नागेश (आण्णा) दुबळे, दिलीप खंदारे, भैय्यासाहेब मस्के,भैय्या साळवे, महेंद्र वडमारे, दयानंद उजगरे, अक्षय कोकाटे, मनोज बोराडे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, पप्पू वडमारे, के.के. कांबळे, आप्पा मिसळे, गौतम कांबळे, जितू धन्वे, संजय हनवते सोनू वडमारे, दिपक कांबळे, गणेश वाघमारे, अजिंक्य वडमारे आदिनी केले आहे.

# चोरट्यांना पकडले काय? गाडीचा नंबर घेतला? असे म्हणून पोलीस पुन्हा झोपले!

## दोन गाईंना बेशुद्ध करून चोरण्याचा प्रयत्न; शेतकऱ्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप; पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह ?

वडवण (प्रतिनिधी): दुष्काळाने होरपळणारा शेतकरी, पशुधन जगवण्यासाठी सुरू असलेली धडपड आणि त्यातच जनावरांवर डल्ला मारणाऱ्या चोरट्यांचे वाढते धाडस! अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. वडवणी शहरात रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी पहाटे पावणेचारच्या सुमारास दोन गाईंना बेशुद्ध करून चोरण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, गाईंच्या ओरडण्याने जाग आलेल्या पशुपालकाने आरडाओरड करत चोरट्यांच्या दिशेने धाव घेतल्याने त्यांचा चोरीचा डाव फसला. या घटनेनंतर पोलिसांना माहिती देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला, 'तुम्ही चोरट्यांना पकडून ठेवले आहे काय? गाडीचा नंबर घेतला आहे काय?' असे प्रश्न विचारण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे तक्रारीची दखल घेण्याऐवजी शेतकऱ्यालाच प्रश्न विचारणाऱ्या पोलिसांच्या भूमिकेवर संताप व्यक्त होत आहे.



**गाईंना बेशुद्ध करून वाहनात टाकण्याचा प्रयत्न**

वडवणी शहरातील महादेव मंदिराशेजारी दिनकर सुखदेव डोंगरे यांचे घर आहे. त्यांच्या घरासमोरील पटांगणात दहा म्हशी, पाच गाई आणि काही वासरे बांधलेली असतात. नेहमीप्रमाणे रात्री जनावरांना चारा-पाणी करून डोंगरे झोपण्यासाठी गेले होते. मात्र, रविवारच्या पहाटे चोरट्यांनी त्यांच्या जनावरांवर डल्ला मारण्याचा प्रयत्न केला.

पहाटे पावणेचारच्या सुमारास चोरट्यांची एक गाडी डोंगरे यांच्या घरासमोर आली. त्यातून पाच ते सहा जण खाली उतरले. त्यांनी डोंगरे यांच्या दोन गाईंना बेशुद्ध करण्यासाठी इंजेक्शन दिले. त्यानंतर या गाईंना उचलून वाहनात टाकण्याचा प्रयत्न सुरू केला. याच वेळी गाईंचा ओरडण्याचा आवाज आल्याने डोंगरे यांना जाग आली.

त्यांनी तातडीने दरवाजा उघडून बाहेर पाहिले असता, काही जण गाईंना उचलण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसले. डोंगरे यांनी मोठ्याने आरडाओरड करत चोरट्यांच्या दिशेने धाव घेतली. त्यांच्या आवाजाने चोरट्यांची धावपळ उडाली आणि त्यांनी वाहनात बसून घटनास्थळावरून पळ काढला. त्यामुळे गाई चोरीला जाण्यापासून वाचल्या; मात्र, दोन्ही गाई बेशुद्धावस्थेत पडल्या होत्या.

**पशुवैद्यकीय पथकाने वाचवले गाईंचे प्राण**

दोन्ही गाईंची अवस्था पाहून डोंगरे यांनी तातडीने वडवणी येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कांबळे यांच्याशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय पथकात पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर दिलीप ढिमढेरे, डॉ. भागवत चोले, कल्याण वारे, केंद्रे घटनास्थळी दाखल झाले. डॉक्टरांनी दोन्ही गाईंवर उपचार केले. वेळेत उपचार मिळाल्याने गाईंचे प्राण वाचले.

एकीकडे चोरट्यांनी जनावरे चोरण्यासाठी बेशुद्ध करण्याचा प्रयत्न केला, तर दुसरीकडे आपल्या जनावरांचे प्राण वाचवण्यासाठी डोंगरे यांची धडपड सुरू होती. सुदैवाने गाई वाचल्या; अन्यथा आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्याला आणखी मोठा फटका बसला असता.

**'गाडीचा नंबर घेतला आहे काय?' पोलिसांचा शेतकऱ्याला सवाल**

घटनेनंतर दिनकर डोंगरे यांनी वडवणी पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. मात्र, तेथे त्यांच्या तक्रारीची अपेक्षित दखल घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. डोंगरे यांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या वेळी पोलीस ठाण्यात काही कर्मचारी झोपलेले होते, तर एक कर्मचारी जागा होता. त्यांनी त्या कर्मचाऱ्याला आपल्या जनावरांची चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याचे, चोरट्यांनी गाईंना बेशुद्ध करून वाहनातून पळवून नेण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले.

मात्र, या घटनेची गांभीर्याने दखल घेण्याऐवजी 'तुम्ही चोरट्यांना पकडून ठेवले आहे काय? गाडीचा नंबर घेतला आहे काय?' असे प्रश्न विचारण्यात आल्याचा आरोप डोंगरे यांनी केला आहे. त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले नसल्याने ते निराश होऊन घरी परतले. चोरीचा प्रयत्न झाल्यानंतर चोरट्यांना पकडणे किंवा त्यांच्या वाहनाचा क्रमांक मिळवणे प्रत्येक वेळी शक्य होत नाही. अशा परिस्थितीत नागरिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू करणे आणि आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित असते. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांनी नेमकी कोणती कारवाई केली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### यापूर्वीही दोन म्हशी चोरीला; लाखोंचे नुकसान

दिनकर डोंगरे यांना यापूर्वीही पशुधन चोरीचा फटका बसला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, याआधी त्यांच्या सुमारे दीड ते पावणेदोन लाख रुपये किमतीच्या दोन म्हशी चोरट्यांनी वाहनातून चोरून नेल्या होत्या. या घटनेनंतर पोलिसांनी शोध घेण्याचे प्रयत्न केले; मात्र, चोरीला गेलेल्या म्हशींचा अद्याप शोध लागलेला नसल्याचे डोंगरे यांचे म्हणणे आहे. आधीच लाखोंचे नुकसान सहन केलेल्या डोंगरे यांना आता पुन्हा चोरीच्या प्रयत्नाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे त्यांच्या मनात पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी निर्माण झाली आहे. यापूर्वीच्या चोरीच्या घटनेचा तपास आणि आताच्या चोरीच्या प्रयत्नाची चौकशी यांना गती देण्याची गरज आहे.

### दुष्काळात पशुधन जगवायचे कसे?

वडवणी तालुक्यात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडले आहेत. जनावरांसाठी पिण्याचे पाणी मिळणे कठीण झाले असून, चाऱ्याची उपलब्धताही चिंतेचा विषय बनली आहे. शासनाने दुष्काळ जाहीर केला असला, तरी पशुधन जगवण्यासाठी पुरेशा उपाययोजना होत नसल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. अशा परिस्थितीत शेतकरी स्वतःच्या अडचणी बाजूला ठेवून जनावरांना जगवण्यासाठी धडपड करत आहेत. कारण पशुधन हे शेतकऱ्यांसाठी केवळ उत्पन्नाचे साधन नाही, तर त्यांच्या कुटुंबाचा अविभाज्य भाग आहे. शेतकरी आपल्या जनावरांवर लेकरांप्रमाणे प्रेम करतात. पाणी आणि चारा मिळवण्यासाठी संघर्ष सुरू असतानाच आता जनावरे चोरीला जाण्याची भीतीही त्यांना सतावत आहे.वडवणी तालुक्यात यापूर्वीही जनावरे चोरीला गेल्याच्या घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. शहरातील काही जनावरे बेपत्ता झाल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. त्यामुळे पशुधन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

### पोलीस निरीक्षक वर्षाताई शिंदे यांनी लक्ष घालावे

शेतकऱ्यांसमोर एकीकडे दुष्काळ, चारा-पाण्याची टंचाई आणि पिकांच्या नुकसानीचे संकट आहे, तर दुसरीकडे पशुधन चोरीची भीती आहे. अशा परिस्थितीत जनावरांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवणे, संशयास्पद वाहनांची तपासणी करणे, पशुधन चोरीच्या घटनांचा गांभीर्याने तपास करणे आणि नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. वडवणी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक वर्षाताई शिंदे यांनी या घटनेची योग्य ती दखल घेऊन चोरीच्या प्रयत्नाचा तपास करावा, तसेच रात्रीच्या वेळी पोलिसांची सतर्कता वाढवावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. दुष्काळात जनावरांना जगवण्यासाठी शेतकरी झगडत असताना, त्यांच्या पशुधनावर चोरट्यांची नजर आणि तक्रारीनंतर पोलिसांच्या भूमिकेबाबत निर्माण झालेले प्रश्न यामुळे वडवणीतील शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.ञ

---

मंगळवार । दिनांक १३ ऑक्टोबर २०२६

दैनिक डोंगरचा राजा प्रस्तुत

**दैनिक प्रश्नमंजुषा उपक्रम**

दररोज 10 प्रश्न - स्पर्धा परीक्षेची भक्कम तयारी

खास इयत्ता 2 री वी ते 12 वी विद्यार्थ्यांसाठी

आजचे प्रश्न मनापासून सोडवा आणि अचूक उत्तर निवडा. | उद्या तुमची प्रगती तपासा - किती प्रश्न बरोबर आले ते पाहा. | यशाकडे दररोज एक पाऊल टाका!

विषय : मराठी | इंग्रजी | गणित | बुद्धिमत्ता | सामान्यज्ञान

अधिक माहितीसाठी संपर्क
श्री. अनिल वाघमारे (मुख्य संपादक) 9822548696
प्रा. भागवत गोंडे (परीक्षा विभाग प्रमुख) 74478 44939

सूचना - १) योग्य पर्याय निवडा व गोल करा २) सर्व प्रश्नांसाठी एक वही करा त्यात प्रश्न लिहून काढा ३) प्रश्नमंजुषा कात्रण कट करा जपून ठेवा.

## मराठी

**1.** 'ज्याचा त्याला ठाऊक, दुसऱ्याला काय ठाऊक!' या वाक्यातील अधोरेखित आशयाशी सर्वाधिक जवळचा अलंकारिक अर्थ कोणता?

- A) दुसऱ्याच्या मनातील विचार सहज ओळखता येतात.
- B) स्वतःच्या अनुभवाची जाणीव दुसऱ्याला पूर्णपणे होईलच असे नाही.
- C) प्रत्येक व्यक्तीला सर्व गोष्टींचे ज्ञान असते.
- D) दुसऱ्याच्या अनुभवावर नेहमी विश्वास ठेवावा.

**2** 'त्याने गरिबांना अन्नदान केले.' या वाक्यातील 'गरिबांना' या शब्दाची विभक्ती ओळखा.

- A) प्रथमा
- B) द्वितीया
- C) चतुर्थी
- D) सप्तमी

## English Grammar

**3** Choose the correct indirect speech.
He said, "I have completed my work."

- A) He said that I have completed my work.
- B) He said that he had completed his work.
- C) He said that he has completed his work.
- D) He told that he completed his work.

**4** Choose the grammatically correct sentence.

- A) No sooner he arrived than it started raining.
- B) No sooner had he arrived when it started raining.
- C) No sooner had he arrived than it started raining.
- D) No sooner did he arrived than it started raining.

## Mathematics (Semi-English Medium)

**5** The price of an article is increased by 20% and then decreased by 20%. What is the net percentage change in its original price?

- A) No change
- B) 4% increase
- C) 4% decrease
- D) 2% decrease

**6** The ratio of the present ages of A and B is 4 : 5. After 6 years, the ratio will be 5 : 6. What is B's present age?

- A) 24 years
- B) 30 years
- C) 36 years
- D) 40 years

## बुद्धिमत्ता चाचणी

**7** पुढील संख्या मालिकेतील प्रश्नचिन्हांच्या जागी योग्य संख्या निवडा.
२, ६, १५, ३१, ५६, ?

- A) ८०
- B) ८६
- C) ९२
- D) ९६

**8** एका सांकेतिक भाषेत TABLE हा शब्द UBCMF असा लिहिला जातो. त्याच नियमानुसार CHAIR हा शब्द कसा लिहिला जाईल?

- A) DIBJS
- B) DIBIR
- C) DHCJS
- D) EIBJS

## सामान्य ज्ञान

**9** भारतीय निवडणूक आयोग — भारतीय संविधानातील कोणत्या अनुच्छेदानुसार संसद, राज्य विधिमंडळे तसेच राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणूकांच्या अधिक्षण, निर्देशन व नियंत्रणाची जबाबदारी निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आली आहे?

- A) अनुच्छेद ३२४
- B) अनुच्छेद ३२५
- C) अनुच्छेद ३२६
- D) अनुच्छेद ३२९

**10** निवडणूक आयोगाची नियुक्ती प्रक्रिया — मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त यांच्या नियुक्तीसाठी मुख्य निवड समितीची रचना मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवाशर्ती व पदावधी) अधिनियम, २०२३ नुसार कोणती आहे?

- A) पंतप्रधान, भारताचे सरन्यायाधीश आणि राष्ट्रपती
- B) राष्ट्रपती, लोकसभेचे अध्यक्ष आणि केंद्रीय गृहमंत्री
- C) पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेले केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री
- D) पंतप्रधान, राज्यसभेचे सभापती आणि मुख्य निवडणूक आयुक्त

## उत्तरसूची

दि. 12/10/2026, वार - सोमवार

1-B, 2-C, 3-A, 4-B, 5-D, 6-C, 7-B, 8-C, 9-B, 10-A

## इंग्रजी व्याकरण - महत्वाची माहिती

परीक्षेसाठी उपयुक्त - लक्षात ठेवा!

### संक्षेप (Abbreviations)

S = Subject = कर्ता

O = Object = कर्म

P.P. = Past Participle Of Verb क्रियापदाचे तिसरे रूप.

योग्य ज्ञान, यशाची गुरुकिल्ली!

### Tenses (काल) – Active & Passive Voice

| Tenses | | Active Voice | Passive Voice |
|---|---|---|---|
| Present | Simple | S + V + O | O + to be + P.P. + by + S |
| | Perfect | S + have/has + P.P. + O | O + have/has + been + P.P. + by + S |
| | Continuous | S + to be + ing + O | O + to be + ing + P.P. + by + S |
| | Perfect Continuous | S + have/has + been + ing + O | O + have/has + been + being + P.P. + S |
| Past | Simple | S + Past From of Verb + O | O + to be + P.P. + by + S |
| | Perfect | S + had + P.P. + O | O + had + been + P.P. + by + S |
| | Continuous | S + to be + ing + O | O + to be + being + P.P. + by + S |
| | Perfect Continuous | S + had + been + ing + O | O + had + been + being + P.P. + by + S |
| Future | Simple | S + shall/will + V + O | O + shall/will + be + P.P. + by + S |
| | Perfect | S + shall/will + have + P.P. + O | O + shall/will + have + been + P.P. + by + S |
| | Continuous | S + shall/will + to be + ing + O | O + shall/will + be + being + P.P. + by + S |

- व्याकरण समजून घ्या - इंग्रजीत आत्मविश्वासाने बोला -

# श्री.उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा पुरस्कार वितरण सोहळा

## येत्या शनिवारी मुंबईत; सर्वांनी उपस्थित राहावे; मुख्य विश्वस्त श्री.एस.एस.देशमुख यांचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी): अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे शिवसेना पक्षप्रमुख श्री.उध्दव ठाकरें यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.. जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे..**

पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी परिषदेच्यावतीने दरवर्षी पत्रकारितेत भरीव योगदान देणाऱ्या पत्रकारांचा विविध पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मान केला जातो. यावर्षी बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांना जाहीर झाला आहे. २५ हजार रूपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. त्याच बरोबर यावर्षीचे आचार्य अत्रे स्मृती पुरस्कार- ज्येष्ठ पत्रकार प्रशांत कदम,सावित्रीबाई फुले पत्रकारिता पुरस्कार – जान्हवी मुळे,हिंदी पत्रकारितेचे भीष्माचार्य बाबुराव पराडकर पुरस्कार – अनुराग त्रिपाठी,विशेष मान्यवरांच्या रकमेतील पुरस्कार दत्ताजीराव तटकरे स्मृती पत्रकारिता सचिन परब (इटीव्हीचे मुंबई ब्यूरो चीफ),स्वातंत्र्यसेनानी मनोहरपंत चिवटे आरोग्य पत्रकारिता पुरस्कार – संतोष आंधळे,माणिकराव देशमुखे देवडीकर कृषी पत्रकारिता –सुनील पाटील (कोल्हापूर सकाळ),भगवंतराव इंगळे स्मृती पत्रकारिता अविनाश महालक्ष्से (नागपूर), नागोजीराव उर्फ आण्णासाहेब दुधगावकर स्मृती – अभय देशपांडे, प्रमोद भागवत स्मृती शोध पत्रकारिता –महेश तिवारी (न्यूज १८ लोकमत, गडचिरोली),संतोष पवार स्मृती पत्रकारिता – बापूसाहेब जाधव (सातारा, ग्रामोद्धार) यांना जाहीर करण्यात आला आहे. सदरचा कार्यक्रम हा शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६, सायं. ६.०० वाजता. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई या ठिकाणी होत आहे. दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहावं असे आवाहन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख, अध्यक्ष शिवराज काटकर, विशस्त शरद पावळे, किरण नाईक, मुंबई शाखेचे अध्यक्ष राजा आचाटे, मुंबई अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष दीपक कैतके, डिजिटल मिडिया परिषदेचे अनिल वाघमारे, माजी अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सुरेश नाईकवाडे, मन्सुरभाई शेख, शोभा जयपुरकर आर्दिनी केले आहे.





# सहा शेतकऱ्यांचा पंधरा एकर ऊस जळून खाक

## महावितरणच्या गलथान कारभार; तात्काळ आर्थिक मदत द्यावी



माजलगाव (प्रतिनिधी): माजलगाव तालुक्यातील पट्टी तांडा या गावांमध्ये सहा शेतकऱ्याचा तब्बल १५ एकर ऊस जळून खाक संबंधित ऊस महावितरणच्या गलथान कारभारामुळे जळाला असा शेतकऱ्यांचा आरोप, पट्टी तांडा या गावातील शेतकरी विठ्ठल किसन राठोड, कल्याण भीमा राठोड , बाळासाहेब भीमा राठोड ,सुंदर गेमा राठोड,होनाजी गेमा राठोड, उत्तम सखाराम पवार, दादासाहेब सोळंके, महादेव सोळंके , बाबासाहेब पवार या सर्व शेतकऱ्यांचा महावितरण च्या गलथान कारभारामुळे १५ एकर ऊस सर्वांचा मिळून खाक झाला आहे, सध्या सहकार कारखाने सध्या बंद आहेत ऊसाला दरवाडी संदर्भात युवा शेतकरी संघर्ष समितीने कारखाना बंद ,कोयता बंद, या घोषणेने सध्या माजलगाव कार्यक्षेत्रातील सहकार कारखाने बंद आहेत, याच पार्श्वभूमीवर माजलगावच्या पट्टी तांडा या गावांमध्ये तब्बल सहा शेतकऱ्यांचा पंधरा एकर ऊस जळून खास झाला आहे, या घटनेने शेतकरी हवालदिल झाला आहे, लवकरात लवकर पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी शेतकरी करत आहे,

## विश्वांबर मोरे यांचे निधन



माजलगाव (प्रतिनिधी): तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील रहिवासी असलेले विश्वांबर दिगंबरराव मोरे वय ५९ वर्षे यांचे अल्पशा आजाराने आज दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिव देहावर दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता पुरुषोत्तमपुरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, अरविंद, समाधान आणि सुरज अशी तीन मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

## सुसंस्कारामुळे माणसं मोठी व गुणी होत असतात–प्रा.कावेरी खुरणे

चौसाळा । अमोल शेटे

चौसाळा येथील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये समाजशास्त्र विभागाच्या वतीने महिला सक्षमीकरण आत्मविश्वासाकडून आत्मनिर्भरतीकडे या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. प्रमुख व्याख्यात्या म्हणून पाटोदा महाविद्यालयातील प्राध्यापिका सौ. कावेरी खुरणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे हे होते व पदव्युत्तर संचालक सुधाकर डॉ. वनवे, उपप्राचार्य गणपती ढवळशंक, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विलास भिलारे व्यासपीठावर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा. कावेरी खुरणे यांनी समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक असून



आज ही ग्रामीण भागामध्ये पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रियांना दुय्यम अधिकार दिले जात असतात त्यामुळे त्यांना शिक्षणाच्या संधी कमी उपलब्ध असून चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र ठरवून सामाजिक बंधने लाभली जात आहेत हे खरे दुर्दैव आहे. आत्मसन्मान आणि आत्मनिर्भर याचा विचार करावयाचा झाल्यास सर्वप्रथम शिक्षण आणि स्त्रिया मधील अंधकार दूर केला पाहिजे त्यांना चौफेर अशा स्वरूपाचे ज्ञान आत्मसात होणे गरजेचे असून शिक्षण असेल तरच हे सर्व शक्य आहे नसता स्त्री ही पुरुषप्रधान संस्कृतीत गुलाम ठरत असल्याची खंत ही त्यांनी व्यक्त केली म्हणून शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही आणि शिक्षणामुळेच सामाजिक परिवर्तन होत असते. स्त्रियां मधील अज्ञान दूर करण्यासाठी अधिकाधिक प्रमाणात स्त्रिया सुशिक्षित होणे गरजेचे असून तरच त्यांना आधुनिक समाज व्यवस्थेतील सावित्रीचे महत्व समजेल आणि स्त्री ही अबला नसून सबला आहे ही भावना त्यांच्यामध्ये वाढीस लागेल. स्त्रियांची कौटुंबिक बंधने कमी करून त्यांना पुरुषासारखे स्वातंत्र्य देणे आजचा काळाची गरज आहे

# दुष्काळाची तीव्रता पाहता गाजावाजा न करता सामाजिक उपक्रम

## काकाजी मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त कीर्तन व अन्नदान सेवेचे आयोजन

केज । प्रकाश मुंडे

परिसरातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन कोणताही भपका किंवा गाजावाजा न करता अत्यंत साधेपणाने व सामाजिक भान जपत अंबेजोगाईचे नगराध्यक्ष श्री. नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त 'अमृततुल्य कीर्तन सेवा व अन्नदान सेवा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भाजप सरचिटणीस सुनील भाऊ घोळवे, समस्त गावकरी व परिसरातील भाविक मंडळींच्या वतीने या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

हा विशेष उपक्रम रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात सायंकाळी ०८ ते १० या वेळेत ह.भ.प. श्री. बाळू महाराज



गिरगावकर यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. या कीर्तन सेवेसाठी संगीतसाथ म्हणून भजन सम्राट किशोर महाराज येडे, गायनाचार्य सुनील महाराज सारुक, मृदंग विशारद तुळशीराम महाराज उबाळे, मृदंग विशारद प्रवीण महाराज यादव, मृदंग विशारद गणेश महाराज भोसले आणि गायनाचार्य सखाराम महाराज धस यांची साथ लाभणार आहे. याचबरोबर, भाविकांसाठी दुपारी ०४ ते सायंकाळी ०८ या वेळेत महाप्रसादाच्या (अन्नदान) भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. वेळ (कीर्तन): रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६, सायंकाळी ०८ ते १० वाजता. भोजन (अन्नदान) वेळ: दुपारी ०४ ते सायंकाळी ०८ वाजेपर्यंत. ठिकाण: मुंडेवाडी, ता. केज, जि. बीड

आयोजक: सुनील भाऊ घोळवे (सरचिटणीस, भाजप), समस्त गावकरी व परिसरातील भाविक मंडळी

दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमास मुंडेवाडीसह परिसरातील सर्व भाविक भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक सुनील भाऊ घोळवे व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. ज्ञानेश्वर मिरगे यांच्या 'विचार संपदा' ग्रंथाची शासनाकडून प्रकाशनासाठी निवड

शेगाव (प्रतिनिधी): येथील संत साहित्याचे अभ्यासक तथा लेखक डॉ. ज्ञानेश्वर मिरगे यांच्या 'विचार संपदा' या ललित गद्य ग्रंथाची महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने प्रकाशनासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या साहित्यिक वाटचालीतील हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण साहित्याची प्रकाशनासाठी निवड केली जाते. साहित्य क्षेत्रातील तज्ज्ञ समितीने डॉ. मिरगे यांच्या 'विचार संपदा' या ग्रंथाचे



परीक्षण करून त्यातील लेखन गुणवत्तेबाबत अनुकूल अभिप्राय दिला आहे.

मंडळाच्या वतीने या ग्रंथाच्या प्रकाशनाची पुढील प्रक्रिया सुरू असून, येत्या महिन्यात ग्रंथ प्रकाशनासाठी पूर्णत्वास जाणार असल्याचे कार्यालयीन पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. यासंदर्भातील पत्र मंडळाचे रामेश्वर रोकडे यांनी डॉ. मिरगे यांना पाठवून त्यांचे अभिनंदन केले आहे.

संत साहित्याच्या अभ्यासासोबतच वैचारिक आणि ललित लेखनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. ज्ञानेश्वर मिरगे यांच्या 'विचार संपदा' ग्रंथाला शासनाच्या साहित्यविषयक मंडळाकडून मिळालेली ही मान्यता शेगावच्या साहित्यविश्वासाठीही आनंदाची बाब ठरली आहे.










Dainik Dongarcha Raja Newspaper Published and Owned by **Anil Shriram Waghmare** and Printed at **Balasaheb jijaram kadbane, Shri Jagmitra Printers & Sales Corporation,** Sumati Nagar, Jalna road, Beed, Dist - Beed Pin- 431122 (Maharashtra) and published at Dongarcha raja, Main Road, wadvani, Tq.Wadvani, District Beed. 431144 (Maharashtra) **Editor : Anil Shriram Waghmare**

दैनिक डोंगरचा राजा हे पत्र मालक, प्रकाशक **अनिल श्रीराम वाघमारे** यांनी मुद्रक बालासाहेब जिजाराम कडबाने यांच्या श्री जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कार्पोरेशन, सुमतीनगर, जालना रोड, बीड जि.बीड – पिन– ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून डोंगरचा राजा कार्यालय,मेन रोड, वडवणी, ता.वडवणी जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. फोन – ९४२२५९१८०५, निवासी संपादकः डॉ.एल.बी.वाघमारे, **संपादक- अनिल श्रीराम वाघमारे** (या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)